# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.12.2025** **वार- शुक्रवार**

---

**रेल्वे**

महाराष्ट्रातील रेल्वेचं जाळं आणखी विस्तारण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. वाढीव अर्थसंकल्पीय सहाय्य, जलद प्रकल्प अंमलबजावणी आणि व्यापक स्थानक पुनर्विकास उपक्रमांद्वारे, गेल्या दशकात महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक अनेक पटींनी वाढली आहे, असं वैष्णव यांनी सांगितलं. महाराष्ट्रात हाती घेतलेल्या काही मुख्य प्रकल्पांमध्ये 3 हजार 37 कोटी खर्चाच्या दौंड मनमाड या 236 किलोमीटर दुहेरीकरण प्रकल्पाचा समावेश आहे.

**पिंपरी चिंचवड प्रश्न**

येत्या 8 डिसेंबर ते 14 डिसेंबर पर्यंत होणाऱ्या राज्याच्या हिवाळी अधिवेशनात, पिंपरी चिंचवड शहरातील विविध प्रश्नांचा आपण आढावा घेणार असल्याचं पिंपरी चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे आणि आमदार अण्णा बनसोडे यांनी सांगितलं आहे. विविध आस्थापनांमध्ये सुरक्षा तपासणीची मागणी, पवना नदी सुधार प्रकल्प, अप्रशिक्षित वाहन चालकांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी सक्षम प्रशिक्षण प्रणाली उभारणे, उद्योग नगरीतील अघोषित भार नियमांवर उपाययोजना करणे, याशिवाय हिंजवडीमधील आयटीयन्सच्या विविध समस्यांवर परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी फास्टट्रॅक लेबर कोर्ट प्रणाली विकसित करणे अशा 48 प्रश्नांकडे शासनाचं लक्ष वेधण्यासाठी तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात येणार असल्याचं आमदार जगताप यांनी सांगितलं.

**पुरस्कार**

फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचातर्फे रमाई महोत्सवाचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर यांचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी म्हणजेच उद्या सकाळी 11 वाजता महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक परिसरात हे पुरस्कार वितरण होणार आहे.

**ऊस-लागवड**

राज्यात सध्या 13 लाख 11 हजार 808 हेक्टर क्षेत्र ऊस पिकाखाली आहे. आडसाली, पूर्वहंगामी ऊस लागवडीमध्ये गतवर्षापेक्षा सुमारे 66 हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावर लागवड वाढली आहे. यंदाच्या सर्व हंगामात मिळून ऊस लागवडीखालील एकंदर क्षेत्र 15 लाख हेक्टरवर पोहचण्याचा कृषी विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे पुढील वर्षाच्या गाळपासाठी राज्यात मोठ्या प्रमाणावर उसाचं पीक येण्याची आशा निर्माण झाली आहे.

राज्यात चालू वर्षी अतिवृष्टी होऊन खरीप पिकांचं जरी नुकसान झालं असलं तरी ऊस पिकासाठी हा पाऊस अन्य पिकांच्या तुलनेत लाभदायी ठरला आहे.

**DDA**

राज्यातील प्रयोगशील शेतक-यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांतर्गत तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम वर्ष २०२५ मध्ये सर्वसाधारण आणि आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या ५ पिकासाठी पिकस्पर्धेचं आयोजन करण्यात येत आहे.
जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभागी व्हावं,असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. अधिक माहिती संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तसंच महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**

महात्मा फुले कृषि विद्यापीठातील मराठी माध्यमाचा दोन वर्षे कालावधीचा कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम आणि इंग्रजी माध्यमाचा तीन वर्षे कालावधीचा तसेच माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम, या दोन्ही अभ्यासक्रमात मोठा बदल करून, नवनवीन तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी, दहा जिल्ह्यातील घटक प्राचार्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. कृषि तंत्रज्ञान विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्रातील विविध पिकांच्या जाती, लागवड तंत्रज्ञान, नैसर्गिक शेती, कौशल्यपूर्ण शिक्षण देणे हा कृषि विद्यापीठांचा मूळ उद्देश असल्याचे डॉ. बोडके यांनी सांगितलं. सदरचा अभ्यासक्रम राज्यातील चारही विद्यापीठात लागू करण्याबाबतचा मानस त्यांनी व्यक्त केला.

**आयुष-रुग्णालय**

पुण्यातील औंध जिल्हा रुग्णालय परिसरातील आयुष रुग्णालय सुरू होऊन दीड वर्ष पूर्ण होत असून उपचारांची मागणी सातत्यानं वाढत आहे. 30 खाटांच्या या रुग्णालयात पंचकर्मसारखे उपचार मोफत मिळत आहेत. रुग्णालयात सध्या योगा, आयुष, होमिओपॅथी, युनानी, नॅचरोपथी उपचार उपलब्ध आहेत. आत्तापर्यन्त बाह्यरुग्ण विभागात 48 हजार 372 रुग्णांनी उपचार घेतले आहेत, तर 6879 नागरिकांनी पंचकर्म प्रक्रिया करून घेतली आहे. मधुमेह आणि रक्तदाबाच्या गुंतागुंती कमी करण्यासाठीही या रुग्णालयात विशेष उपचार पद्धती वापरली जाते. त्याचा जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असं आवाहन आयुष रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बालाजी लकडे यांनी केलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 14 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, उद्याही साधारणपणे असंच तापमान राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**